# —:प्रेस नोट:—

## भ्रष्टाचार जनजागृती सप्ताह दरम्यान जिल्हा परिषद विभाग गडचिरोली येथील बांधकाम विभागातील कार्यकारी अभियंता व परीचर यांचेवर लाच—लुचपत प्रतिबंधक विभाग गडचिरोली ची कारवाई

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | गडचिरोली |
| पोलीस ठाणे, अप क्रं. दाखल दिनांक व वेळ | पो. स्टे गडचिरोली अप क्र. १६४४/२०२६<br>दिनांक २९/१०/२०२६ वेळ ००/३० वा. |
| आरोपी लोकसेवक यांचे नाव व पद | १) श्री. नितीन तानाजी बारहाते, वय ५६ वर्ष पद—कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग गडचिरोली रा. प्लाट नं. २फ्लैट नं. ६०१, वेदांत पेरिडोट, सेट्रल बाजार रोड बजाज नगर शंकर नगर नागपूर ह.मु. श्री. पुल्लरवार यांचे घरी किरायाने शिवानी पेट्रोल पंम्प समोर आरमोरी रोड गडचिरोली जि. गडचिरोली<br>२) श्री. ईश्वर गोपाळजी निसार वय ५७ वर्ष पद—परिचर जिल्हा परिषद बांधकाम विभाग गडचिरोली, ह.मु. सोनापूर कॉम्प्लेक्स वार्ड क्रं. १४ जि. गडचिरोली |
| कायदा कलम | कलम—७ (अ), १२ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८(सुधारणा २०१८) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १२,०००/— रूपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | १२,००० हजार रूपये |

थोडक्यात हकिकत

गडचिरोली जिल्हयातील जिल्हा परिषद बांधकाम विभागातील आलोसे क्र. १) श्री. नितीन बारहाते यांचे करीता यातील आलोसे क्र.२) ईश्वर गोपाळजी निसार यांनी आलोसे क्रं. १ यांचे संमतीने १२,०००/— हजार रूपयांची मागणी करून, १२,०००/— हजार रुपयांची लाच रक्कम जिल्हा परिषद कार्यालयात स्विकारतांना अॅन्टी करप्शन ब्युरो, गडचिरोलीच्या पथकाने रंगेहाथ पकडले.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, तक्रारदार यांना सन २०२४—२०२५ या वित्तीय वर्षातील एकात्मीक बालविकास सेवा योजना अंतर्गत मौजा जांभगांव येथील ग्रामपंचायत अंतर्गत असलेल्या अंगणवाडी इमारतीचे बांधकाम करण्याचे १३,७८,०००/—रू. चे कंत्राट मिळाले होते. सदरचे काम पूर्ण झाल्यानंतर त्यांना बिलाची काही रक्कम मिळाली असून, उर्वरीत ६,१५,०००/— रू. चे बिल बाकी असल्याने, तक्रारदार हे दिनांक २२/१०/२०२६ रोजी आलोसे क्रं. १) श्री. नितीन तानाजी बारहाते, कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परीषद गडचिरोली यांना जावून भेटले असता, त्यांनी तक्रारदार यांना उर्वरीत बिल काढण्याकरीता उर्वरीत बिलाचे २ टक्के रक्कम दयावी लागेल असे सांगुन, पुढील बोलणे चपराशी यांचेसोबत करा असे सांगीतले परंतु त्या दिवशी तक्रारदार यांचे नातेवाईक मरण पावल्याने ते दिनांक २२/१०/२०२६ रोजी चपराशी यांना न भेटता त्यांनी दिनांक २८/१०/२०२६ रोजी आलोसे यांना भेटण्यास त्यांचे कार्यालयात जाणार असून तेथे त्यांना लाचेची मागणी होण्याबाबत खात्री असल्याची तक्रार दिल्यावरून तक्रारदार हे शासकिय पंचासह आलोसे २) श्री. ईश्वर निसार यांना जावून भेटले असता, त्यांनी आलोसे क्रं. १ यांचेकरीता उर्वरीत बिलावर २ टक्के रक्कमेप्रमाणे १२,०००/— रू. लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न होवून तक्रारदार हे आलोसे क्रं. १ यांचेकडे मागणीचे पडताळणीकरीता गेले असता, आलेसे क्रं. १ यांनी आलोसे २ यांचेसोबत बोलुन घ्या असे सांगितल्याने तक्रारदार पुन्हा आलोस क्रं. २ यांना येवून भेटले तेव्हा आलोसे क्रं. २ यांनी तक्रारदार यांना मागणी केलेली लाच रक्कम आणुन देण्यास सांगीतले त्यावरून तक्रारदार हे १२,०००/— हजार रू. लाच रक्कम घेवून गेले असता आलोसे क्रं. २ हे आलोसे १ यांचे संमतीने त्यांचेकरीता १२,०००/— लाच रककम स्विकारतांना रंगेहात मिळुन आल्याने, आलोसे क्रं. १) श्री. नितीन तानाजी बारहाते , कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग जिल्हा परीषद गडचिरोली व आलोसे क्रं. २) श्री. ईश्वर गोपाळजी निसार परिचर बांधकाम विभाग जिल्हा परिषद गडचिरोली यांचे विरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ (सुधारणा २०१८) चे कलम कलम—७, १२ प्रमाणे पोस्टे गडचिरोली येथे अप क्र. १६४४/२०२६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

१) सापळा अधिकारी :— पोलीस उपअधिक्षक श्री. विक्रांत सगणे, ला.प्र.वि. गडचिरोली

२) पर्यवेक्षण अधिकारी :— पोलीस उपअधिक्षक श्री. विक्रांत सगणे, ला.प्र.वि. गडचिरोली

३) सापळा पथक :— पोलीस उपअधीक्षक श्री. विक्रांत सगणे, पोहवा/किशोर जौंजारकर, पोहवा/राजेश पदमगिरीवार, पो.अ./संदिप घोरमोडे, पो.अ./प्रविण जुमनाके, पो.अ./संदिप उडाण, सर्व लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गडचिरोली

४) तपासी अधिकारी:— पोलीस निरीक्षक श्री. किरण बगाटे, ला.प्र.वि. गडचिरोली

**मार्गदर्शन अधिकारी :—**

१) मा. डॉ. श्री.दिगंबर प्रधान, पोलीस अधिक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो, नागपुर परीक्षेत्र

२) मा. श्रीमती माधुरी बाविस्कर, अपर पोलीस अधिक्षक, ला.प्र.वि. नागपुर

३) मा. श्री. विजय माहुलकर, अपर पोलीस अधिक्षक, ला.प्र.वि. नागपुर

गडचिरोली जिल्हयातील सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, त्यांच्याकडे कोणत्याही शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी किंवा त्यांच्या वतीने खाजगी इसम कोणतेही शासकीय काम करुन देण्यासाठी कायदेशीर फी व्यतीरीक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास तात्काळ अॅन्टी करप्शन ब्युरो, गडचिरोली यांचेशी संपर्क साधावे असे आवाहन, पोलीस उपअधिक्षक श्री. विक्रांत सगणे यांनी केले आहे.

पोलीस उपअधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय गडचिरोली
मोबाईल/व्हॉटसअॅप क्रमांक— ७५८८०४१०६४
दुरध्वनी क्रमांक — ०७१३२—२९५०२० टोल फ्रि क्रमांक — १०६४

(विक्रांत सगणे)
पोलीस उप-अधिक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,